# <u>क्रियापदाचे अर्थ व काळ</u>

**क्रियापदाचे अर्थ :** क्रियापदावरून विशेषत : आज्ञा, कर्तव्य, संकेत, इत्यादी. गोष्टीचा बोध होतो, त्यास 'क्रियापदाचा अर्थ' म्हणतात.

**अर्थाचे प्रकार :**

**अर्थाचे एकूण चार (४) प्रकार आहेत, ते पुढीलप्रमाणे –**

१) **आज्ञार्थ :** क्रियापदावरून जेव्हा प्रत्यक्ष <u>आज्ञा करणे, आज्ञा मानणे, विनंती करणे, उपदेश करणे</u> ह्या गोष्टीचा बोध होतो, त्यास **'आज्ञार्थी क्रियापद'** असे म्हणतात.

उदा : १) राम जेवण कर . (आज्ञा करणे)

२) बाबा शाळेत जाऊ का . (आज्ञा मागणे)

३) मला पहिले बक्षीस मिळू दे. ( प्रार्थना)

४)मित्र सत्याने वागावे . ( उपदेश )

२) **विध्यर्थ** : क्रियापदावरून जेव्हा विधी म्हणजे <u>कर्तव्य, शक्यता, योग्यता, इच्छा</u> ह्या गोष्टीचा बोध होतो, तेव्हा त्यास **'विध्यर्थ क्रियापद'** असे म्हणतात.

उदा: १) आपण सामाजिक ठिकाणी स्वच्छता ठेवावी .( कर्तव्य )

२)राम तुम्हच पहिला बॉल खेळावा . ( योग्यता)

३) ईश्वर सेवा सदा घडावी. ( इच्छा )

४) तो बहुदा खोटे बोलत असावा. (तर्क )

५) मला वळणदार रस्त्याने गाडी चालवायला मिळावी . (शक्यता
)

६) मला जरा पुढे जाऊ द्या. ( विनंती )

३)**संकेतार्थ** : क्रियापदावरून एक गोष्ट दुसरीवर अवलंबून आहे अशा प्रकारचा बोध होतो, तेव्हा त्यास **'संकेतार्थ क्रियापद'** असे म्हणतात.

उदा : १) जर थोडा अभ्यास केला असता तर पहिला क्रमांक आला असता.

२)जर वेळेवर आम्ही पोचलो असतो तर जागा मिळाली असती.

३) आम्हाला जर निवारा मिळाला तर किती छान होईल.

४) **स्वार्थी :** जेव्हा आज्ञा, विधी, संकेत असा काही विशेष अर्थ कळत नाही, त्यांचा स्वत;चा अर्थ तेवढाच त्यावरून कळतो, म्हणून त्यास **'स्वार्थी क्रियापद'** असे म्हणतात.

**या वाक्यातील क्रियापदावरून केवळ काळाचा बोध होतो**.

उदा: १) ती मुलगी हुशार आहे.

२)तो चित्रकर आहे.

# काळाचे प्रकार

**व्याख्या** : क्रियापदावरून क्रिया कोणत्या वेळी घडत आहेत, याचा जो बोध होतो, त्यास काळ असे म्हणतात.
कालचे एकूण तीन (३) प्रकार पडतात.

१) **वर्तमानकाळ :** क्रियापदावरून क्रिया चालू आहे असे समजते, तेव्हा त्यास '**वर्तमानकाळ**' असे म्हणतात.

उदा : १) राम खेळतो.
२)विद्यार्थी गातात.
३) प्रभाकर चालतो..

२) **भूतकाळ :** क्रियापदावरून क्रिया पूर्वी झाली असे कळते, तेव्हा त्यास '**भूतकाली क्रियापद**' असे म्हणतत.

**उदा** : १) कुत्रा पळाला.
२) गाय बसली.
३) जेवण झाले.

**३) भविष्यकाळ** : क्रियापदावरून क्रिया पुढे व्हायची आहे. असे कळते, त्यास '**भविष्यकाळ क्रियापद**' असे म्हणतात.

**उदा** : १) मामा-मामी येतील.
२)आम्ही खेळायला जाऊ .
३) प्रतिक मला पैशे देईन.

## वर्तमानकाळाचे प्रकार

१) **साधा वर्तमानकाळ :** जेव्हा क्रियापदाच्या रूपावरून क्रिया आता घडत आहे असे समजते तेव्हा त्या वाक्याचा काळ '**साधा वर्तमानकाळ**' असतो.

**उदा** : १) मी जेवण करतो.
२)आम्ही खेळायला जातो.
३) बाबा पेरू खातो.
४) कोकिला गाते.

**२) चालू/अपूर्ण वर्तमानकाळ** : जेव्हा वाक्यातील क्रियापदाच्या रूपावरून क्रिया वर्तमानामध्ये चालू असण्याचा बोध होतो, तेव्हा वाक्याचा काळ '**चालू/अपूर्ण वर्तमानकाळ**' असतो.

**उदा** : १) मी काम करत आहे.
२)मी स्वयंपाक करत आहे.

**३) पूर्ण वर्तमानकाळ :** जेव्हा वाक्याच्या क्रियापदावरून क्रिया नुकतीच पूर्ण झाल्याचा बोध होतो, तेव्हा त्या वाक्यात काळ '**पूर्ण वर्तमानकाळ**' असतो.

**उदा** : १) आमचे जेवण झाले आहे.
२)माझे काम झाले आहे.

**४) रीति वर्तमानकाळ :** जेव्हा वाक्यातील क्रियापदवरून ती क्रिया वर्तमानात सतत घडत असल्याची वहिवाट/रीत दिसून येत असेल, तर त्या वाक्याचा काळ **'रीत वर्तमानकाळ'** असतो.

**उदा** : १) आम्ही खेळत असतो.

२)ती फिरायला जात असतो.

## वर्तमाणकालचा उपयोग

१) **लवकर होणारी क्रिया दर्शवण्यासाठी** .

**उदा** : १) तुम्ही जेवण चालू करा, मी येतोच. ( येईन )

२) **वर्तमानकाली क्रिया घडते हे दर्शवण्यासाठी (साधा वर्तमान**)

**उदा** : १) मी आंबा खातो.

२)मी पोळी करतो.

३) **त्रिकालबाधित सत्य असलेले विधान करताना**.

**उदा** : १) पृथ्वी सूर्याभोवती फिरते.

२)सूर्य पूर्वेस उगवतो.

४) **एखादी क्रिया सतत घडते अश्या अर्थी** .

उदा : १) मी नेहमीच गात असतो.

५) **भूतकाळातील घटना वर्तमानकाळात सांगतात....**

**उदा** : १) शिवाजी म्हणतात.(म्हणाले )

६) **अवतरण चिन्हातील क्रिया दर्शविण्यासाठी** .

**उदा** : १) राजकारणी म्हणतात, 'काळजी नको, मी तुझ्या पाठीशी आहे'.

७) **लगतचा भूतकाळ सांगताना ( संनिहित भूत)**

**उदा** : १) आम्ही पोहलो, तोच तुम्ही हजर !

## भूतकाळाचे प्रकार

क्रियापदावरून क्रिया पूर्वी झाली असे जेव्हा समजते तेव्हा क्रियापद '**भूतकाळ**' असते.

१) **साधा भूतकाळ :** क्रिया नुकतीच घडली असा बोध होतो तेव्हा त्यास '**साधा भूतकाळ**' म्हणतात.

**उदा : १)** मी जेवण केले.

२)मी अभ्यास केला.

२) **चालू/अपूर्ण भूतकाळ** : क्रिया भूतकाळात चालू असण्याचा अर्थबोध होतो, तेव्हा त्यास '**चालू/अपूर्ण भूतकाळ**' म्हणतात.

उदा : १)मी जेवण करत होतो.

२)मी अभ्यास करत होतो.

३) **पूर्ण भूतकाळ** : क्रिया भूतकाळात पूर्ण झाल्याचा बोध होतो, तेव्हा त्यास '**पूर्ण भूतकाळ**' म्हणतात.

उदा : १) मी जेवन केले होता.

२)मी अभ्यास केला होता.

४) **रीति भूतकाळ** : क्रिया भूतकाळात सतत घडत असल्याची वहिवाट/रीत दिसून येते, तेव्हा त्यास '**रीति भूतकाळ**' असे म्हणतात.

उदा : १) मी जेवण करत असे .

२)मी अभ्यास करत असे.

## भूतकाळाचा उपयोग

१) **वर्तमानकाळातील अपूर्ण क्रिया संपण्याच्या बेतात आहे. अशा अर्थी**

उदा : १) ते पहा विमान आले.

२)मी पहातोतर ते उभे होते.

२) **क्रिया पूर्वी घडली हे सांगताना (साधा भूतकाळ**)

उदा : १) आम्ही वेळेवर पोहोचलो.

३) **एखादी क्रिया भविष्यकाली खात्रीने होणार या आर्थी .**

उदा : १) निकाल लागला, कि मी अधिकारी झालो म्हणून समज.

४) **संकेतार्थ असल्यास (संभव** )

उदा : १) रमेश लवकर निगला तर ठीक.

५) **आताच्या घटनेनंतर, पण ताबडतोब घडणाऱ्या क्रियेबद्दल**.

उदा : १) तुम्ही चालू करा , मी आलोच!

# भविष्यकाळ

क्रियापदावरून क्रिया पुढे व्हायची आहे असे जेव्हा समजते तेव्हा 'भविष्यकाळ' असतो.

# भविष्यकाळाचे प्रकार

१) **साधा भविष्यकाळ :** जेव्हा क्रिया भविष्यात घडेल इतकाच अर्थबोध होतो,तेव्हा त्यास साधा भविष्यकाळ म्हणतात.

उदा : १) मी जेवण करेल.

२)मी काम करेन.

२) **चालू/अपूर्ण भविष्यकाळ :** जेव्हा क्रिया भविष्यात चालू असण्याचा बोध होतो, जेव्हा त्यास चालू/अपूर्ण भविष्यकाळ म्हणतात.

उदा : १) मी जेवण करत असेन.

२)मी काम करीत असेन.

३) **पूर्ण भविष्यकाळ :** जेव्हा क्रिया भविष्यात पूर्ण झाल्याचा बोध होतो, त्यास पूर्ण भविष्यकाळ म्हणतात.

उदा : १) मी जेवण केले असेन.

२)मी काम केले असेन.

४) **रीति भविष्यकाळ :** जेव्हा क्रिया भविष्यात सतत घडत असल्याची वहिवाट किंवा रीत दिसून येत असेल,तेव्हा त्यास रीति भविष्यकाळ असे म्हणतात.

उदा : १) मी जेवण करत जाईन.

२)मी काम करीत जाईन.

## भविष्यकालाच उपयोग

१) **संकेत दर्शविण्यासाठी**

उदा : १) जर तुम्ही अभ्यास केला तर यशस्वी होत राहाल.

२) **इच्छा व्यक्त करण्यासाठी**

उदा : १) मला जेवण हवे होते.

३) **अशक्यता दर्शविण्यासाठी**

उदा : १) सगळेच कामचुकार कसे असतील.

४) **क्रिया भविष्यात घडले हे दर्शविण्यासाठी**

उदा : १) पुढच्या वर्षी काम मिळेल.

५) **संभवता दर्शवण्यासाठी**

उदा : १) मामा आज घरी असतील.